**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – जाधव बाळासाहेब माधवराव,

वय – ३७ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

राहणार – रा.लातूर, ता.लातूर, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.१८.०७.२०१५ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्याकरीता निलंगा येथील एस.टी. राज्य परिवहन महामंडळाच्या वर्कशॉपच्या पत्र्याच्या शेडमध्ये बोलवले होते. त्यावेळी माझ्यासोबत व्यंकट चौधरी, पोलिस माशाळ व यशपाल माने हे होते. पोलीसांनी त्या ठिकाणचा माझ्या समक्ष पंचनामा केला. त्याठिकाणी इंधनाचा टॅंकर थांबला होता, त्या टॅंकरच्या खाली बॅरल ठेवले होते. टॅंकरमधील डिझेल त्या बॅरलमध्ये पडले होते. बाजुला डिझेल सांडले होते. टॅंकरमधुन डिझेल काढण्याकरिता त्या टॅंकरला पाईप लावला होता. (आता मला दि.१८.०७.२०१५ रोजीचा प्रस्तुत कामातील निशाणी ६० वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. तो पंचनामा माझ्यासमक्ष झालेला होता.

**उलटतपास आरोपी व त्यांच्या विधीज्ञांना पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.15 14:57:49 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक–१५/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा